सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/६४** **दि. ०१/०७/२०२६**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**

**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**

**विषय : निवडणूक साक्षरता क्लब (Electrol Literacy Club) ची स्थापना करणेबाबत.**

**संदर्भ क्र. : जा.क्र. पीईई/कावि/६०८/२०२६ दि. १२/०६/२०२६ रोजीचे चे पत्र.**

**महोदय/महोदया,**

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परीसंस्थेमध्ये निवडणूक साक्षरता क्लब (Electrol Literacy Club) ची स्थापना करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहे. सदर निर्देशानुसार खालीलप्रमाणे निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करणेबाबत मार्गदर्शक सूचना मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली पत्र क्र. ४९१/ELC/Communication, दि. ०५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

१. **निवडणूक साक्षरता क्लबची (ELCs) स्थापना :**

- प्रत्येक संस्थेत एका शिक्षकाची/प्राध्यापकाची ELC समन्वयक/नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.
- समवयस्कांच्या माध्यमातून सहभाग वाढवण्यासाठी आवर्तन (rotational) तत्त्वावर कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassadors) नियुक्त करण्यास प्रोत्साहन द्यावे.

२. **निवडणूक साक्षरता आणि जागरूकता उपक्रम :**

ELC च्या उपक्रमांमध्ये खालील बाबींचा समावेश असू शकतो.

- भारताचे संविधान, लोकशाही मूल्ये आणि निवडणूक प्रक्रिया यावर आधारित जागरूकता सत्रे.
- भारत निवडणूक आयोगाची भूमिका आणि जबाबदाऱ्यांची ओळख करून देणे.
- मतदार याद्या तयार करणे आणि त्या अद्ययावत करणे याबाबतची मूलभूत माहिती देणे.
- मतदार नोंदणीची कार्यपद्धती आणि मतदार सेवांविषयी जागरूकता निर्माण करणे.
- विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) आणि मतदार यादीशी संबंधित इतर उपक्रमांची माहिती देणे.
- ईव्हीएम (EVM) आणि व्हीव्हीपॅट (VVPAT) बाबत प्रात्यक्षिके आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे.
- मतदान केंद्र स्तरावरील कार्यपद्धती, मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी प्रक्रियेची माहिती देणे.
- प्रश्नमंजुषा (Quizzes), वादविवाद, मॉक पोल (अभिरूप मतदान), निबंध स्पर्धा आणि इतर सहभागात्मक उपक्रम राबवणे, नैतिक आणि माहितीपूर्ण मतदानाला प्रोत्साहन देणारे कार्यक्रम राबवणे.
- निवडणुकांशी संबंधित चुकीच्या बातम्या आणि अफवा ओळखून त्यांना चोख प्रत्युत्तर देणारे उपक्रम राबवणे.

**३. डिजिटल आणि सोशल मीडिया एकत्रीकरण :**

- तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळवण्यासाठी ELC उपक्रम सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मशी जोडणे.
- संस्थात्मक मार्गदर्शनाखाली तरुणांद्वारे निवडणूक जागरूकतेशी संबंधित मजकूर/सामग्री (content) तयार करण्यास प्रोत्साहन देणे.
- डिजिटल साक्षरता, तथ्य-पडताळणी (fact-checking) कौशल्ये आणि सोशल मीडियाच्या जबाबदार वापराला प्रोत्साहन देणे.
- शक्य असेल तिथे जिल्हा व राज्याच्या अधिकृत सोशल मीडिया चॅनेल्स आणि ECINET च्या माध्यमातून ELC च्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती प्रसारित करणे.

**४. ओळख आणि प्रोत्साहन :**

- सक्रिय ELC सदस्यांना सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाऊ शकते.
- उल्लेखनीय/नाविन्यपूर्ण निवडणूक साक्षरतेचे उपक्रम राबवणाऱ्या उत्कृष्ट ELC चा गौरव केला जाऊ शकतो.
- या ELC आराखड्याचा मुख्य उद्देश माहितीपूर्ण, जागरूक आणि जबाबदार भावी मतदारांची पिढी तयार करणे, तसेच आपल्या समुदायामध्ये लोकशाही सहभागाला प्रोत्साहन देण्यास आणि अफवांना आळा घालण्यास सक्षम असणारे Youth Ambassadors विकसित करणे हा आहे.

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त परीसंस्थेमध्ये निवडणूक साक्षरता क्लब (Electrol Literacy Club) ची स्थापना करणेबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

मा. उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार आपल्या अधिनस्त महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करण्याबाबत तसेच ELC ची स्थापना केलेबाबतची माहिती संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे पाठवण्याबाबत संबंधिताना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (निवडणुक शाखा)

**बि विंग ४ था मजला, पुणे ४११००१**

फोन नं.०२०-२६१३४४७८ Email-dydeopune1@gmail.com


क्र.पीईई 3 /कावि/ 608 /2026 दिनांक :12/06/2026

प्रति,

मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले विद्यापिठ पुणे
भारती विद्यापिठ पुणे
यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ पुणे
एम. आय. टी. पुणे
डी. वाय. पाटील, पुणे

विषयः – शैक्षणिक संस्थांमध्ये निवडणूक साक्षरता क्लब (Electrol Literacy Club) ची स्थापना करुन कार्यान्वित करणेबाबत.

संदर्भ – 1) मा. मुख्य निवडणूक अधिकारी, म. रा. मुंबई पत्र क्र. संकीर्ण-2026/प्र. क्र. 29/33/ निवडणूक-5, दि. 08/06/2026

2) मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली पत्र क्र. 491/ELC/ Communication, दि. 05/06/2026

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले नुसार मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानूसार आपले अधिनस्त सर्व महाविद्यालये व विद्यापिठ स्तरावर निवडणूक साक्षरता क्लब (Electrol Literacy Club) ची स्थापना करणेकामी निर्देश प्राप्त झाले आहे. सदर निर्देशानुसार खालीलप्रमाणे निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करणेबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये देणेत आलेल्या आहेत.

**I. निवडणूक साक्षरता क्लबची (ELCs) स्थापना:**

- प्रत्येक संस्थेत एका शिक्षकाची/प्राध्यापकाची ELC समन्वयक/नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.
- समवयस्कांच्या माध्यमातून सहभाग वाढवण्यासाठी आवर्तन (rotational) तत्त्वावर कॅम्पस ॲम्बेसेडर (Campus Ambassadors) नियुक्त करण्यास प्रोत्साहन द्यावे.

**II. निवडणूक साक्षरता आणि जागरूकता उपक्रम:**

ELC च्या उपक्रमांमध्ये खालील बाबींचा समावेश असू शकतो:

- भारताचे संविधान, लोकशाही मूल्ये आणि निवडणूक प्रक्रिया यावर आधारित जागरूकता सत्रे.
- भारत निवडणूक आयोगाची भूमिका आणि जबाबदाऱ्यांची ओळख करून देणे.

- मतदार याद्या तयार करणे आणि त्या अद्ययावत करणे याबाबतची मूलभूत माहिती देणे.
- मतदार नोंदणीची कार्यपद्धती आणि मतदार सेवांविषयी जागरूकता निर्माण करणे.
- विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) आणि मतदार यादीशी संबंधित इतर उपक्रमांची माहिती देणे.
- ईव्हीएम (EVM) आणि व्हीव्हीपॅट (VVPAT) बाबत प्रात्यक्षिके आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे.
- मतदान केंद्र स्तरावरील कार्यपद्धती, मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी प्रक्रियेची माहिती देणे.
- प्रश्नमंजूषा (Quizzes), वादविवाद, मॉक पोल (अभिरूप मतदान), निबंध स्पर्धा आणि इतर सहभागात्मक उपक्रम राबवणे.
- नैतिक आणि माहितीपूर्ण मतदानाला प्रोत्साहन देणारे कार्यक्रम राबवणे.
- निवडणुकांशी संबंधित चुकीच्या बातम्या आणि अफवा ओळखून त्यांना चोख प्रत्युत्तर देणारे उपक्रम राबवणे.

**III. डिजिटल आणि सोशल मीडिया एकत्रीकरण:**

- तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळवण्यासाठी ELC उपक्रम सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मशी जोडणे.
- संस्थात्मक मार्गदर्शनाखाली तरुणांद्वारे निवडणूक जागरूकतेशी संबंधित मजकूर/सामग्री (content) तयार करण्यास प्रोत्साहन देणे.
- डिजिटल साक्षरता, तथ्य-पडताळणी (fact-checking) कौशल्ये आणि सोशल मीडियाच्या जबाबदार वापराला प्रोत्साहन देणे.
- शक्य असेल तिथे जिल्हा व राज्याच्या अधिकृत सोशल मीडिया चॅनेल्स आणि ECINET च्या माध्यमातून ELC च्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती प्रसारित करणे.

**IV. ओळख आणि प्रोत्साहन:**

- सक्रिय ELC सदस्यांना सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाऊ शकते.
- उल्लेखनीय/नाविन्यपूर्ण निवडणूक साक्षरतेचे उपक्रम राबवणाऱ्या उत्कृष्ट ELC चा गौरव केला जाऊ शकतो.
- या ELC आराखड्याचा मुख्य उद्देश माहितीपूर्ण, जागरूक आणि जबाबदार भावी मतदारांची पिढी तयार करणे, तसेच आपल्या समुदायामध्ये लोकशाही सहभागाला प्रोत्साहन देण्यास आणि अफवांना आळा घालण्यास सक्षम असणारे Youth Ambassadors विकसित करणे हा आहे.

उपरोक्त प्रमाणे आपल्या अधिनस्त महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना देणेत याव्यात ही विनंती. तसेच ELC ची स्थापना केलेबाबतची माहिती संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे देणेत यावी.

सोबत संदर्भीय पत्राची छायांकीत प्रत जोडली असे.

आपली विश्वासू,

( मिनल कळसकर)
उपजिल्हाधिकारी तथा
उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे